नगर परिषद/नगर पंचायती
सार्वत्रिक निवडणुका-२०१६-१७
निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी व केंद्राध्यक्ष यांची नेमणूक

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३३/का-६,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २३ सप्टेंबर, २०१६.

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

विषय:- **नगर परिषदा/नगर पंचायती : सार्वत्रिक निवडणूक- २०१६-१७ -**
निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी व केंद्राध्यक्ष यांची नेमणूक

महोदय,

आपल्याला माहितच आहे की, डिसेंबर-२०१६ ते फेब्रुवारी-२०१७ या कालावधीत मुदती संपणाऱ्या नगर परिषदा/नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने जिल्हाधिकारी व पर्यवेक्षक अधिकारी म्हणून विभागीय आयुक्त यांची आहे

२. राज्य निवडणूक आयोगाने त्यांच्या क्रमांक- एमएनसी-११.०१/सीआर-२३/का-११, दिनांक १७/८/२००१ च्या आदेशाद्वारे नगर परिषदा/नगर पंचायतींच्या निवडणुकांमध्ये निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नेमणुकीचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान केलेले आहेत.

३. राज्य शासनाने "महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१६ (सन २०१६ चा अध्यादेश क्रमांक १६)", दिनांक ३०/०८/२०१६ अन्वये नगर परिषदांमध्ये (नगर पंचायती वगळून) एकसदस्यीय प्रभाग पध्दतीऐवजी बहुसदस्यीय प्रभाग पध्दती व तसेच नगर परिषदांच्या नगराध्यक्षांची निवड थेट जनतेमधून करण्याची पध्दती लागू केली आहे.

४. वरील परिस्थिती (बहुसदस्यीय प्रभाग पध्दती व नगराध्यक्षाची थेट निवडणूक) लक्षात घेता निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी व मतदान केंद्राध्यक्ष यांच्या नेमणुकीबाबत. राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

**(अ) निवडणूक निर्णय अधिकारी**

(i) प्रत्येक नगरपरिषदा/नगर पंचायतींकरिता एका स्वतंत्र उप जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात यावी.

(ii) जिल्हयामध्ये आवश्यकतेप्रमाणे उप जिल्हाधिकारी उपलब्ध नसतील तर विभागीय आयुक्त यांनी इतर जिल्हयांमधून आवश्यकतेनुसार उप जिल्हाधिकारी उपलब्ध करून द्यावेत.

(iii) विभागामध्ये आवश्यकतेप्रमाणे उप जिल्हाधिकारी उपलब्ध नसतील तर उप जिल्हाधिकारी यांच्या समकक्ष अधिकाऱ्याची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात यावी.

(iv) नेमणूक करताना त्या अधिकाऱ्याची सचोटी प्रामाणिक व त्यास निवडणुकीचा अनुभव असणे आवश्यक आहे.

(v) त्याच जिल्हयात ३ वर्षे नियुक्ती नसलेला व जिल्ह्याचा स्थानिक रहिवाशी नसावा.

**(ब) सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी**

(i) प्रत्येक नगर परिषदा/नगर पंचायतीमधील मुख्याधिकारी यांची सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमणूक करावी.

(ii) याशिवाय, आवश्यक असेल तर आवयकतेप्रमाणे तहसिलदार/नायब तहसिलदार यांची अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमणूक करावी.

(iii) अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांची नेमणूक करताना खालील बाबींचा विचार करण्यात यावा :-

- नगर परिषद/नगर पंचायतींमध्ये प्रभागांची संख्या,
- नगर परिषदेचे नगराध्यक्षांची थेट निवड

- आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी व मतदारांना प्रलोभन देण्यासाठी करण्यात येणाऱ्या गैरप्रकारावर (उदा. आर्थिक बळाचा दुरुपयोग, अवैध दारु वाटप, इत्यादी) अंकुश ठेवणे, इत्यादी बाबी.

(iv) प्रामाणिक, संशयातीत सचोटी असलेले अधिकारीच सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमण्यात यावेत.

(v) त्याच जिल्हयात ३ वर्षे नियुक्ती नसलेला व जिल्ह्याचा स्थानिक रहिवाशी नसावा.

**(क) मतदान केंद्राध्यक्ष**

जिल्हाधिकारी यांनी शक्यतो वर्ग-२ च्या ( पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसेल तरच वर्ग - ३ च्या) अधिकाऱ्याची मतदान केंद्राध्यक्ष म्हणून नेमणूक करावी. मात्र ती करताना खालील बाबी कटाक्षाने पाळाव्यात :-

(i) तो त्या नगर परिषद/नगर पंचायतींचा अधिकारी/कर्मचारी नसावा.

(ii) ज्या प्रभागात नियुक्ती केली आहे त्या प्रभागातील रहिवाशी किंवा मतदार नसावा.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

( ध. मा. कानेड )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र